# 'क्रांतिकारी महिला संघटना'
# पहिला वर्धापन दिन

७ मार्च एक अतिशय आनंदाचा व अभिमानाचा दिवस. कारण आमची 'क्रांतिकारी महिला संघटना' अनेक अडचणींचा डोंगर पार करून यशाचे प्रथम वर्षाचे शिखरावर उभी आहे. आज पहिला वर्धापन दिन साजरा होत आहे. मागच्या वर्षी ज्यावेळी संघटनेची स्थापना झाली तेव्हा तिच्या 'क्रांतिकारी' या नावावरूनच खूप वादळ झाले. अजूनही अनेक भगिनीमध्ये त्याविषयी गैरसमज आहे. तो सर्व वादळवारा सहन करून ध्येयाच्या पूर्तीकडे वाटचाल होत आहे.

आजच्या अध्यक्षा होत्या 'स्त्री' मासिकाच्या संपादिका 'विद्याताई बाळ'. ते स्थान त्यांनी मानाने भूषविले. कारण संघटनेच्या स्थापनेपासून वेळोवेळी अनेक प्रकारच्या मदतीचा हात विद्याताईकडून आम्हाला मिळत होता. प्रमुख पाहुण्या म्हणून नायगाव पाणी प्रकल्पाच्या 'कल्पनाताई साळुंके' या उपस्थित होत्या.

प्रथम संघटनेच्या निमंत्रक डॉ. नीलम गोऱ्हे यांनी क्रांतिकारी महिला संघटनेचा परिचय करून दिला व कार्यक्रमाची रूपरेखा सांगितली.

त्यानंतर संघटनेच्या मीना इनामदार यांनी संघटनेचा वार्षिक अहवाल सादर केला. त्या म्हणाल्या, रचना, प्रबोधन आणि संघर्ष ही तीन सूत्रे डोळ्यांपुढे ठेवून संघटना कार्य करते. मुख्यतः स्त्रियांचे प्रश्न सोडविणे, त्यांना त्यांचे हक्क अधिकार मिळवून देणे, अडचणीत असलेल्या महिलांना मदत करणे. त्याचप्रमाणे संघटनेने आतापर्यंत ज्या अशा स्त्रियांच्या केसेस हाताळल्या त्याविषयी माहिती त्यांनी सांगितली. अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार, महादेव नगरमधील एका घरमालकाकडून होणारा एका महिलेचा छळ व त्यासाठी केलेले 'जनता कोर्ट' या व अशा अनेक संकटग्रस्त महिलांना मदतीचा हात मिळाला. पुढे त्यांनी संघटनेने आतापर्यंत ४ शिबिरे घेतली त्याविषयी माहिती सांगितली. या शिबिरांच्या निमित्ताने अनेक नामवंत लोकांचे मौलिक विचार ऐकायला मिळाले. तसेच अनेक महिलांनी आपले विचार मांडले त्याच प्रकारे 'अंधश्रद्धा' 'स्त्रियांचे आरोग्य' या विषयीचे प्रदर्शन व स्लाईड-शो पण संघटनेमार्फत अनेक महिलांना दाखवले गेले. संघटनेचे जे प्रबोधनाचे सूत्र त्यानुसार तीन पथनाट्ये सादर केली. नाट्याद्वारे लोकांच्यापर्यंत पोहोचता येते. नुसत्या भाषणापेक्षा नाट्य जनतेच्या मनावर जास्त परिणामकारक होते. म्हणून 'व्रत जुने आशय नवा' हे नाट्य प्रथम सादर केले. आपले जुने सणवार पारंपारिक पद्धतीने न करता समाजाला उपयुक्त असे त्याला नवे वळण कसे द्यावे हे त्याद्वारे सांगितले. नाट्याचे लेखन पण स्वतः मीना इनामदार व जयश्री पोळ यांनी केले होते. तसेच सात दिवसांचा जन जागरण कार्यक्रम, पती-पत्नी मेळावा इत्यादि कार्यक्रम आजपर्यंत संघटनेने केले होते. त्यानंतर स्नेहल अजनाडकर यांनी स्पर्धेचा अहवाल सादर केला. त्या म्हणाल्या.

संघटनेने रामटेकडी, सातववाडी व हडपसर येथे स्त्रियांच्यासाठी खेळ, नाट्यछटा, निबंध, स्मरणशक्ती अशा विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. स्पर्धेमध्ये सभासद भगिनींबरोबर इतर पण अनेक

महिला समाविष्ट होत्या व बहुसंख्य भगिनींनी निर-निराळ्या ठिकाणी परीक्षकांचे पण कार्य केले.

यानंतर जयश्री मायभाटे हिने 'गृहिणी शिक्षणवर्ग' याविषयी माहिती सांगितली. गृहिणी शिक्षणवर्गात काय नवीन शिकायला मिळणार? याबद्दल प्रथम भगिनी साशंकितच होत्या. पण नंतर मात्र खरोखरच खूपच नवीन शिकायला मिळाले असे त्यांनी कबूल केल्यामुळे गृहिणी शिक्षणवर्गाच्या यशाची पावतीच मिळाली. अनेक नामवंत डॉक्टरांची निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने झाली.

निबंध स्पर्धेतील एक निबंध मीरा खोले यांनी सादर केला. त्याचबरोबर जयश्री पोळ यांनी नाटय-छटा स्पर्धेतील प्रथम क्रमांक मिळवलेली त्यांनी स्वत: लिहून सादर केलेली एक नाटयछटा पद्यरूपात सादर केली. कुठेही मंडळात मिटिंगला जावयाचे असले की सकाळपासून गृहिणीला किती किती आघाडींवर तोंड द्यावे लागते हे त्यात सांगितले होते. सर्वच भगिनींच्या अडीअडचणींचे अचूक वर्णन त्यात असल्यामुळे भगि-नींना ती खूपच आवडली. तसेच माधुरी तिखे हिने संघटनेवरून सासू-सून यांचे कसे वादविवाद होतात ते आपल्या नाटयछटेत सादर करून दाखवले.

आता आम्ही वाट पहात होतो प्रमुख पाहुण्यांच्या भाषणाची. आपल्या भाषणात कल्पनाताई यांनी 'नायगाव' पाणीप्रकल्पाविषयी बरीच माहिती सांगितली, अनेक अनुभव कथन केले व सामाजिक संघर्षाबरोबरच आर्थिक संघर्ष कसा अत्यावश्यक आहे ते सांगितले. त्यांच्या भाषणानंतर सर्वांना उत्सुकता होती एका नाटिकेची.

आठ मार्च या 'स्त्रीमुक्ती' दिनाचे दिवशी पुण्यात सर्व संघटना एकत्र येऊन संडास आणि पाणी यांची जेथे अतिशय गैरसोय आहे, ती दूर होण्यासाठी एक मोठा मोर्चा आयोजित केला जाणार होता. त्या विष-याला अनुसरून पाण्यासाठी स्त्रियांची कशी भांडणे होतात हे दर्शविणारी 'पानी ग पानी' ही नाटिका सादर केली. त्यात संघटनेच्या सभासद जयश्री पोळ, मृणालिणी कोठारी, जयश्री मायभाटे, मालती, मीरा बखरे, अंजली पालेचा व भुजबळ यांनी भाग घेतला होता. सर्व स्त्रियांबरोबरच पुरुषवर्गाला पण ही नाटिका फारच आवडली.

आता उत्सुकता होती बक्षिसांची. संघटनेने निर-निराळ्या ठिकाणी ज्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या त्यातील यशस्वी स्पर्धकांना अध्यक्षांच्या हस्ते बक्षिसे दिली गेली. आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्याताईंनी स्पर्धकांचे खूपच कौतुक केले. कारण संघटनेच्या प्रोत्साहनामुळे अनेक स्त्रियांच्या सुप्त गुणांना वाव मिळून स्त्रियांना आपली प्रगती करता आली. त्यांना आपले विचार लिहिता येऊ लागले. नवीन नवीन चार लोकांसमोर बोलायला घाबरणाऱ्या स्त्रिया वर्षभरात चांगल्याच सभाधीट झाल्या आहेत. विद्याताई संघट-नेच्या स्थापनेपासून संबंधित असल्यामुळे सभासद भगिनींमध्ये झालेला हा बदल त्यांना चांगला जाणवला व त्यामुळे खूपच आनंद होत आहे असे त्यांनी सांगितले. पुढे स्त्रीमुक्तीविषयी बोलताना त्या म्हणाल्या की ही स्त्रीमुक्ती म्हणजे पुरुषाविरुद्ध लढा नव्हे. पुष्कळजण असा गैरसमज करून घेत आहेत. हा लढा आहे परंपरेने जखडलेल्या स्त्रियांवरील अन्यायाविरूद्ध, स्त्रियांवर होत असलेल्या अत्याचाराविरुद्ध, समाजात पसरलेल्या अंधश्रद्धेविरुद्ध, अन्यायकारक समाजव्यवस्थेविरूद्ध. हा लढा स्त्री-पुरुष दोघांनी मिळून करायचा आहे. क्रांति करायची ती पुरुषाविरूद्ध नसून वाईट रूढींविरूद्ध आहे. तेव्हा या कार्यात पुरुषांचे सहकार्य अत्यावश्यक आहे व ते त्यांनी गैरसमज दूर करून जरूर करावे. तसेच संघटनेवर अनेक वेळा अनेक टीका झाल्या तरीही सभासद भगिनी नाऊमेद न होता कार्य करीत आहेत. अशाप्रकारे चांगल्या योजना हाती घेऊन त्यांनी चांगले कार्य करावे असे प्रोत्साहन विद्याताईंनी दिले. कोणतीही गोष्ट करताना प्रथम समाजाकडून टीकाच होत असते त्याने खचून न जाता आपले कार्य निश्चितच चांगले आहे अशी आपली पक्की धारणा ठेवून ते करत रहावे कालांतराने समाजालाही ते पटू लागते.' तेव्हा समाजा कडून होणाऱ्या टीकेकडे लक्ष देऊ नका कारण 'काटया वाचून गुलाब नाही.'

शेवटी संघटनेच्या अनेक भगिनींनी संघटनेची गाणी म्हटली व आभार प्रदर्शन होऊन उसाच्या थंडगार व गोड रसाबरोबरच कार्यक्रमाचा शेवट गोड झाला.

–जयश्री पोळ